ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 7 | MARCH - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महात्मा गांधीजींचा सत्याग्रह :संकल्पना



डॉ. संजय सदाशिव गायकवाड
प्राध्यापक व विभाग प्रमुख (इतिहास),
मा. ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.

## प्रस्तावना

भारतासारख्या महान राष्ट्रात आपला समाज हेच आपल्या सगळ्यांचे एकमेव श्रद्धास्थान असले पाहिजे. जात, भाषा, प्रांत अथवा पक्ष यासारख्या इतर कोणत्याही गोष्टींचा विचार समाजभक्तीच्या किंवा देशभक्तीच्या आड येता कामा नये. दुर्दैवाने आज आपल्या समाजात पोशाखीपणा व नखरेलपणाने किडलेल्या दुबळ्या, अशक्त, समाजघटकांना राष्ट्रधर्माचे धडे देण्याची गरज आहे. आजच्या तरुण पिढीला समाजात चांगले जीवन जगण्यासाठी कोणत्या तत्वांचा अंमल केला पाहिजे हे लक्षात यायला हवे. त्या दृष्टीने आपल्या देशात महान राष्ट्रीय कार्य केलेल्या थोर राष्ट्रपुरुषांचे विचार व कार्य त्यांच्या पुढे ठेवणे क्रमप्राप्त ठरते. अशा या थोर राष्ट्रपुरुषामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी हे केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक अनोखे व्यक्तिमत्त्व होते.

## महात्मा गांधीजी

साम्राज्यवादी शक्तीविरुद्ध सुरु असलेल्या स्वातंत्र्य लढ्यात सत्याग्रहाचे नवीनच तंत्र वापरणारे म्हणून गांधीजी विख्यात आहेत. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच देशाच्या जडणखडणीत अनेक बाबींवर त्यांच्या कार्याचा व विचारांचा ठसा उमटला आहे. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीच्या रचनेबरोबरच देशातील सामाजिक संस्थाच्या बाबतीतही महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यामुळे अखंड भारत देशाच्या निर्मितीत त्यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. सत्य, अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध दिलेला लढा हा मानवजातीच्या इतिहासातील अपूर्व लढाच मानावा लागेल. म्हणूनच रवींद्रनाथ टागोर म्हणतात कि, 'असाधुतेशी साधुत्वाने कसे झगडावे याची शिकवण देणारा हा एक महामानव होता'. गांधीजींच्या व्यक्तिमत्वावर कोणत्याही एका धर्माचा, संप्रदायाचा अगर कोणत्याही एका धर्मगुरूंचा प्रभाव नव्हता. त्यांनी विविध धर्माचा, पंथांचा आणि संप्रदाच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करून त्यातून चांगले विचार व तत्वे आत्मसात केली होती. शुद्ध चरित्र, कठोर परिश्रम या अंगभूत गुणांबरोबरच विनम्रपणा, आदर्शवाद, व्यवहारचातुर्य, शिस्तप्रिय तसेच दीनदुबळे व अस्पृश्यांबद्दलची कळकळ हे गुण देखील त्यांच्याकडे होते. गांधीजींच्या जीवनावर त्यांचे मित्र रावजीभाईंच्या तत्वज्ञानाचा पगडा असला तरी गोपाळ कृष्ण गोखले हे

त्यांचे राजकीय गुरु होते. 1920 ते 1947 या कालखंडात गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. त्यांच्या कार्यामुळेच हा कालखंड इतिहासात 'गांधीयुग' या नावाने ओळखला जातो.

गांधीजींच्या विचारसरणीत आणि स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात 'सत्याग्रहाला' अत्यंत महत्वाचे स्थान आहे. दक्षिण आफ्रिकेत वर्णभेदाविरुद्ध लढा देत असताना त्यांचे कर्मयोगाचे तत्वज्ञान सत्याग्रहाच्या रूपाने आकाराला आले. सत्याग्रहाचा अर्थ जे सत्य असेल त्याचा आग्रह धरणे होय. सत्य व अहिंसा या दोन्हीच्या समन्वयातून सत्याग्रह ही शक्ती जन्माला आली. सत्य व अहिंसा ही गांधीजींची दोन मूलतत्त्वे होती तर सत्याग्रह ही त्यांची आत्मशक्ती.त्यांच्या तत्वज्ञानाचा पाया असणाऱ्या सत्य व अहिंसा या तत्वातील सत्य हे गांधीजींच्या विचारांचा पाया होते. सत्याच्या ठिकाणीच परमेश्वराचे अधिष्ठान असते असे गांधीजी म्हणत. समाजात नीतिमत्ता निर्माण करण्यासाठी त्यांनी या दोन तत्वांचा उपयोग केला ब्रिटिश साम्राज्यवादातून भारत स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र भारतात लोकशाही टिकली व विकसित झाली त्याचे संपूर्ण श्रेय गांधीजींच्या सत्याग्रह संकल्पनेस द्यावे लागते. कारण सत्याग्रहामुळे आपल्या देशात नवचैतन्य निर्माण झाले.

## सत्याग्रहाचा अर्थ व उत्पत्ती

सत्याग्रहा ची उत्पत्ती दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या लढ्यातून झाली. दक्षिण आफ्रिकेत घडून आलेल्या आंदोलनाला सुरूवातीला गांधीजींनी 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' हे नाव दिले होते. त्यावेळी या शब्दाचा अर्थ गांधीजींना ही समजला नव्हता मात्र यातून कोणत्यातरी नवीन तत्वाचा जन्म झाला आहे याची जाणीव त्यांना झाली. परंतु जसजशी लढ्याची तीव्रता वाढू लागली तसतसा पॅसिव्ह रेझिस्टन्स या नावामुळे गोंधळ निर्माण होऊ लागला. त्यामुळे गांधीजींना या महान लढ्याला इंग्रजी नाव दिल्याची खंत वाटू लागली. शिवाय हा शब्द सामान्य लोकांच्या तोंडी सहज बसणारा नव्हता. त्यामुळे गांधीजींनी इंडियन ओपिनियन मधून जाहीर केले की या आंदोलना करिता जो कोणी उत्तम शब्द शोधून काढील त्याला एक लहानसे बक्षीस दिले जाईल. यातूनच मगनलाल गांधी यांनी सत - आग्रह याची संधी करून 'सदाग्रह' हा शब्द बनविला आणि बक्षीस देखील मिळवले. हा शब्द निवडण्यामागचे स्पष्टीकरण देताना मगनलाल गांधी लिहितात की, हिंदुस्थानींचे हे आंदोलन महान आग्रह आहे आणि हा महान आग्रह सद म्हणजे शुभ आहे म्हणून मी सदाग्रह हे नाव निवडले'. गांधीजींना देखील हे नाव आवडले मात्र त्यांनी सदाग्रह हा शब्द अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यामध्ये 'द' चा 'त' करून त्याला 'य' जोडला आणि 'सत्याग्रह' हे नाव तयार केले. सत्यात शांततेचा समावेश होतो. हे गृहीत धरून तसेच कोणत्याही गोष्टींचा आग्रह केल्याने तिच्यात शक्ती निर्माण होत असल्याने हिंदुस्थानींच्या आंदोलनाचे नाव सत्य आणि शांततेमुळे निर्माण होणारी शक्ती म्हणजेच 'सत्याग्रह' असे ठेवण्यात आले. पुढे याच नावाने या आंदोलनाची ओळख जगाला झाली. दक्षिण आफ्रिकेतील या लढ्याचा इतिहास म्हणजे गांधीजींच्या आयुष्याचा व विशेष करून त्यांच्या 'सत्याच्या प्रयोगांचा' इतिहास होय. अशाप्रकारे 'सत्याग्रह' या नावाचा जन्म होऊन पॅसिव्ह रेझिस्टन्स हा शब्दप्रयोग बंद झाला.

सत्य आणि आग्रह या दोन शब्दापासून बनलेला 'सत्याग्रह' हा शब्द संस्कृत असून महात्मा गांधीजींनी सत्याला चिकटून रहाणे म्हणजे सत्याग्रह अशी या शब्दाची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, सत्याग्रह हा प्रत्यक्ष कृतीचा प्रभावी मार्ग आहे. अन्यायाचा प्रतिकार हा सत्याग्रहाचा आत्मा असून आपण ज्या प्रश्नासाठी सत्याग्रह करतो तो प्रश्न सत्य व भरीव स्वरूपाचा असावा सत्याग्रहा मध्ये आत्मबलालाच महत्त्व दिले पाहिजे यात हिंसेला अजिबात स्थान नाही. उलट यात धैर्य, धीर, प्रेम व सतत नीतीने लढणे अभिप्रेत आहे. सत्याग्रह

म्हणजे चुकीचा कायदा मोडणे होय. कोणत्याही शासनाचा व समाजाचा कायदा हा चुकीचा असेल तर तो मोडणे हा व्यक्तीचा अधिकार असल्याचे गांधीजी सांगतात. यातूनच गांधीजींनी मिठाचा कायदा मोडला होता.

महात्मा गांधीजींनी सत्य व अहिंसेच्या जोरावर ब्रिटिश सरकार विरुद्ध सत्याग्रहाचे आंदोलन सुरू केले होते. त्यासाठी त्यांनी असहकार, सविनय कायदेभंग, स्वदेशी, हरताळ, बहिष्कार इत्यादींचा मार्ग स्वीकारला. सत्य व अहिंसा हे गांधीजींच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग बनले होते. या तत्वांआधारेच त्यांनी भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. गांधीजींनी तत्वे आणि व्यवहार यांची कधीही फारकत केली नाही. काही पाश्चात्त्य विचारवंतांच्या मते, गांधीजींनी सत्याग्रह ही कल्पना बायबल पासून घेतली आहे, तर काहींच्या मते त्यांनी ही कल्पना टॉलस्टॉयच्या विचारातून घेतली आहे. प्राचीन भारतात देखिल आत्मक्लेशाचा मार्ग अनुसरून अन्यायाविरुद्ध सविनय प्रतिकार केल्याची उदाहरणे सापडतात. गौतम बुद्ध आणि भगवान महावीर यांनी सत्य आणि अहिंसेची शिकवण देऊन सत्याग्रहाची दिशा दाखवली. 'अहिंसा परमो धर्मः' आणि 'सत्यान्नास्ति परो धर्मः' या उक्तीनुसार गांधीजींच्या सत्याग्रहाचे सूत्र आढळते. परंतु गांधीजी म्हणतात, 'सत्याग्रह हा माझा स्वतःचा शोध आहे'. त्यांच्या मते सत्याग्रह सतत विकसित होणारे प्रगतीशील तत्व आहे. ते सामाजिक परिवर्तनाचे व जीवनाचा मार्ग म्हणून आकार घेत आहे. गांधीजींनी या संकल्पनेला नवीन आयाम व आशय देण्याचे मौलिक कार्य केले. एखाद्या शास्त्रज्ञाने निरीक्षण, प्रयोग, सिद्धांत कल्पना आणि पडताळणीकरण या शास्त्रीय प्रक्रियेतून एखादा शोध लावावा तसा गांधीजीने सत्याग्रहाचा शोध लावला. सत्याग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे याचा शोध घेण्याकरिता माणसाला कुठेही बाहेर जावे लागत नाही. तो स्वतः त्याच्या समोर येऊन उभा राहतो. सत्याग्रहात भ्रष्टाचार, खोटेपणा, चलाखी, कपट यांना कोणतेही स्थान नाही.

## सत्याग्रही कसा असावा

सत्याग्रहासाठी विशिष्ट मानसिक ठेवण असावी लागते तसेच सत्याग्रही हा चांगल्या गुणांचा असावा. गांधीजींच्या मते, सत्याग्रही हा सत्याग्रहाचा कणा असल्यामुळे त्याचे विचार स्पष्ट असावेत कारण सत्याग्रही चे विचार हे कृतीत परावर्तित करण्याचे माध्यम आहेत. त्यामुळे तो प्रशिक्षित व विशिष्ट गुण संपादन केलेला असावा. कारण कोणत्याही सत्याग्रहाचे यशापयश हे सत्याग्रहीवरच अवलंबून असते. म्हणूनच गांधीजी सत्याग्रहाला नैतिक समाज निर्मितीचा प्रभावी मार्ग मानतात. त्यांच्या मते, सत्याग्रही हा सत्याचा उपासक असला पाहिजे, त्याने अहिंसा धोरण म्हणून नव्हे तर तत्त्व म्हणून स्वीकारले पाहिजे. त्याने प्रतिपक्षाचा राग व छळ सहन केला पाहिजे, मात्र त्याने प्रतिपक्षाची बदनामी व निंदानालस्ती करू नये, उलट त्याने प्रतिपक्षाचा प्रतिकार असत्याचा सत्याने, उद्दामपणाचा सौजन्याने, उन्मत्त पणाचा नम्रतेने, दुष्कर्माचा चांगल्या कर्माने केला पाहिजे. अग्नीने अग्नीशी लढण्यापेक्षा पाण्याने लढणे जसे उत्तम आहे तसे वाईट विचारांशी चांगल्या विचाराने लढणे कधीही उत्तम असते असे गांधीजी म्हणतात. सत्याग्रही मध्ये विरोधकांची मते ऐकून घेण्याची सहनशीलता व सहिष्णूता असणे अत्यंत गरजेचे असते. त्याने नेहमी तडजोडीला तयार राहिले पाहिजे. अन्याय, जुलुम, शोषण आणि छळ याविरुद्ध शेवटपर्यंत लढा दिला पाहिजे. त्याने जाणून-बुजून कोणत्याही जातीच्या भावना दुखावता कामा नये. सत्याग्रही ने प्रतिपक्षाशी शत्रुत्व न करता नीतिमत्तेला व समाजहिताला घातक असणाऱ्या प्रवृत्तीचा विरोध केला पाहिजे. सत्याग्रहीने नेहमी न्यायाच्या व सत्याच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. तसेच लालसेवर व इंद्रियांवर नियंत्रण ठेवून स्वतःमधील असत्यपणा वैगुण्य याचेही आत्मनिरीक्षण व आत्मपरीक्षण करावे. त्यासाठी सत्याग्रही चे आचार-विचार सद्सदविवेकबुद्धीला अनुसरून असावेत.

## गांधीजींच्या सत्याग्रहाचे स्वरूप

सत्याग्रह हे मूलतः सत्यनिष्ठ व्यक्तीचे शस्त्र असून त्याची अहिंसेशी बांधिलकी असली पाहिजे. विरोधकांकडून येणाऱ्या अपेक्षित आणि अनपेक्षित कोणत्याही धोक्यांना सत्याग्रहीने घाबरून जाऊ नये. याबाबत गांधीजी म्हणतात की, 'नेहमीच माझी अशी धारणा राहिली आहे की आपण आपल्या चुकांकडे बहिर्वक्र दुर्बिणीने आणि इतरांच्या चुकांकडे त्या विरुद्ध बाजूने पाहिले तर दोघांची न्यायोचित तुलना होऊ शकेल. माझा असा विश्वास आहे की ज्याला सत्याग्रही बनण्याची इच्छा आहे त्याने काळजीपूर्वक आणि प्रामाणिकपणे या नियमांचे पालन केले तर तो उत्तम सत्याग्रही होऊ शकतो'. उत्तम सत्याग्रही च्या साह्याने कोणताही सत्याग्रह यशस्वी होऊ शकतो असा त्यांचा विश्वास होता.

सत्याग्रहात सत्याचा अविरत शोध आहे आणि सत्या पर्यंत पोहोचण्याचा दृढ संकल्प आहे. ही एक अशी शक्ती आहे की जी गुपचूप आणि वरवर शांतपणे काम करताना दिसते परंतु वास्तव असे आहे की, या शक्ती पेक्षा अधिक गतीने काम करणारी दुसरी कोणतीही शक्ती या जगात नाही. सत्याग्रहांमध्ये प्रकट व व अप्रकट अशी कोणत्याही प्रकारची हिंसा वर्ज्य आहे. यात मानसिक, वाचिक वा कर्माद्वारे केलेल्या हिंसेला कोणतेही स्थान नाही. सत्याग्रह नेहमीच सौजन्यशील असतो तो कधीही इजा करीत नाही. हिंसेचा संपूर्ण पर्याय म्हणून याची स्थापना करण्यात आल्याचे गांधीजी सांगतात. त्यांच्या मते सत्याग्रह आपल्याला जगण्याची आणि मरण्याची या दोन्ही कला शिकवतो. देहधारण व्यक्तीकरीता या दोन्ही गोष्टीं चुकणाऱ्या आहेत. गांधीजींच्या कल्पनेतील सत्याग्रह हा विकास प्रक्रियेतील एक विज्ञान आहे. यात खरेपणा पर्वताप्रमाणे प्राचीन असल्याचे आढळून येते. सत्याग्रहात धैर्य आवश्यक असून याचा अर्थ आत्मपिडा होय. म्हणजे सत्याग्रहात विरोधकाऐवजी स्वतःला त्रास सहन करून सत्य सिद्ध करणे होय. सत्याग्रह आणि त्याच्या शाखा असहकार व सविनय प्रतिकार या गोष्टी आणखी काही नसून पिडेच्या नियमांची दुसरी नावे आहेत. यात स्वतःला पूर्णपणे पुसून टाकावे लागते जास्तीत जास्त विनम्रता, असीम धैर्य आणि जळजळीत आस्था म्हणजे सत्याग्रह होय. गांधीजींना विश्वास होता की लोकांकरिता मूलभूत असलेल्या महत्त्वाच्या गोष्टी केवळ तर्काद्वारे मिळविता येऊ शकत नाहीत तर पिडा सहन करण्याचे मूल्य चुकवून त्या मिळवाव्या लागतात. पीडा सहन करणे हा मानवजातीचा नियम आहे तर युद्ध हा जंगलाचा. जंगलाच्या नियमापेक्षा पिडा सहन करण्याचा नियम कितीतरी बलवान असल्याचे ते सांगतात. सत्याग्रहीने भीतीचा कायमस्वरूपी त्याग केलेला असतो. त्यामुळे विरोधकावर विश्वास टाकण्याची भीती त्याला कधीच वाटत नाही. विरोधकांनी जरी त्याला वीस वेळा धोका दिला तरी एकविसाव्या वेळी तो त्याच्यावर विश्वास टाकायला तयार राहील. म्हणजेच मानव स्वभावावर अढळ विश्वास हेच सत्याग्रहाचे सार गांधीजींनी सांगितले आहे.

## सत्याग्रहाचे प्रकार

वैयक्तिक आणि सामूहिक असे सत्याग्रहाचे दोन प्रकार असून गांधीजींनी दोन्ही प्रकारचे सत्याग्रह केले. या दोन्ही प्रकारात सत्याचा आग्रह अन्याय निवारण्याचा हेतू आहे. एका व्यक्तीने केलेला सत्याग्रह म्हणजे वैयक्तिक सत्याग्रह आणि समूहाच्या सहभागाने केलेला हा सामूहिक सत्याग्रह होय. मात्र दोन्ही सत्याग्रह हे समाजाच्या फायद्यासाठीच केले पाहिजेत. दोनही सत्याग्रहात नियम आणि शिस्तीचे काटेकोरपणे पालन होणे महत्त्वाचे आहे. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत वंशभेदाविरुद्ध पहिला in सत्याग्रह केला आणि त्यात त्यांना यशही आले. हा त्यांच्या सत्याग्रहाला मिळालेला पहिला विजय होता. त्यानंतर 1915 मध्ये गांधीजी भारतात आले

आणि त्यांनी देशसेवेला वाहून घेतले. 1916 मध्ये साबरमती आश्रमाची स्थापना करून राजकीय चळवळी बरोबरच सामाजिक सेवाही सुरू केली. स्वातंत्र्य चळवळ आणि सामाजिक सुधारणा यांना गांधीजींनी सारखेच महत्त्व दिले. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सत्याग्रह हा नवीन विचार प्रवाह सुरू करून ब्रिटिशांविरुद्ध लढण्याची आगळी वेगळी पद्धत जगाला दाखवली. त्यावेळी असहकार सत्याग्रह व सविनय कायदेभंग या त्यांच्या नवीन अस्त्रांच्या यशापयशाबद्दल सर्वांनाच अनभिज्ञता होती. त्यांनी आपल्या जीवनात सत्य व अहिंसा ही तत्वे परमश्रेष्ठ मानून आपल्या लढ्याला सत्याग्रहाच्या मार्गाने सुरुवात केली. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या लढ्याला यश आल्यानंतर गांधीजींनी भारतात 1917 मध्ये ब्रिटिशशासनाविरुद्ध चंपारण्य येथे निळच्या शेतकऱ्यांसाठी पहिला सत्याग्रह केला. चंपारण्य सत्याग्रहाने ब्रिटिश साम्राज्यशाही ची शोषणवृत्ती उघड झाली आणि या शोषणाविरुद्ध लढण्याचा गांधीजींना सत्याग्रहा सारखा उपाय देखील सापडला. तसेच या सत्याग्रहामुळे आपल्या पायातील ब्रिटिशांनी अडकवलेल्या पारतंत्र्याच्या बेड्या तुटू शकतात याची जाणीव व खात्री देखील सामान्य जनतेला झाली. परिणामी लोक अन्यायाविरुद्ध संघटित होऊ लागले. बारडोली, खेडा, अहमदाबाद गिरणी कामगार संप येथील सत्याग्रहामुळे संपूर्ण देश अहिंसक युद्धाचे मैदान बनला. हे सर्व सत्याग्रह स्थानिक, पातळीवर स्थानिक प्रश्नांशी संबंधित होते. मात्र रौलेटॲक्ट विरुद्ध करण्यात आलेला सत्याग्रह देशव्यापी होता. तेव्हापासून भारतात सत्याग्रह पर्वाची सुरुवात झाली आणि आज ही स्वातंत्र्योत्तर भारतातच नव्हे तर जगातही सत्याग्रहाचे हे पर्व सुरू आहे. गांधीजी सशस्त्र प्रतिकारापेक्षा सत्याग्रह केव्हाही श्रेष्ठ मानतात. त्यांच्या मते, सत्याग्रहासाठी प्रत्येक स्त्री-पुरुषाने आत्मरक्षणाची कला शिकली पाहिजे यात कोणतेही प्रशिक्षण नाही. सत्याग्रह तर्काने नव्हे तर प्रात्यक्षिकाने अधिकच चांगल्या पद्धतीने सिद्ध करता येतो. सत्याग्रहात हिंसा लूटमार जाळपोळ इत्यादी हिंसाचाराला कोणतेही स्थान नाही. सत्याग्रहाचे शस्त्र हे स्वबाळाचे आभूषण आहे.ते दुर्बला चे आभूषण कधीही होऊच शकत नाही. यात दुर्बला चा अर्थ शरीराने नव्हे तर मनाने वाईट विचारांचा व्यक्ती. चांगल्या गुणांचा व्यक्ती सत्याग्रहाचा उपयोग कधीही चुकीच्या उद्दिष्टासाठी करू शकत नाही. यात एक जरी सत्याग्रही शेवटपर्यंत टिकून राहिला तरी विजय निश्चित असतो. गांधीजींच्या दृष्टिकोनातून सत्याग्रह सर्वाधिक सक्रिय शक्तीपैकी एक आहे. सत्याग्रह हा सूर्यासारखा आहे जो कधीही पृथ्वीवर न चुकता तळपत असतो. आपल्याला जर कळू शकले तर सत्याग्रह करोडो सूर्यापेक्षाही अधिक तेजस्वी आहे. तो जीवन आणि प्रकाश तसेच शांतता आणि सुख यांचा प्रसार करीत असतो. आजही भारताबरोबरच जगातील इतर राष्ट्रातील राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच सामान्य लोक देखील आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सत्याग्रहाचे शस्त्र वापरत असल्याचे दिसून येते. गांधीजी आफ्रिकेत असताना वर्णभेदाविरुद्ध लढले हाच मूलमंत्र मानून नेल्सन मंडेला जीवनभर लढत राहिले. सत्य आणि अहिंसा या गांधीजींच्या नाऱ्याचे मंडेला कडवे समर्थक होते.

## सत्याग्रहा चे सध्याचे स्वरूप

स्वातंत्र्योत्तर काळात ही आपल्याला देशात नेहमी सत्याग्रहाचा वापर होत असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजासाठी सत्याग्रह करून समाजाला न्याय मिळवून दिला. त्यानंतर विनोबा भावे, साने गुरुजी, सुंदरलाल बहुगुणा, बाबा आढाव, मेधा पाटकर, बाबा आमटे, इत्यादींनी आपल्या समाजाला सत्याग्रहाद्वारे न्याय मिळवून दिला. ज्यांना गांधीजी कोण होते हे देखील माहित नाही, ज्यांनी गांधीजींचे तत्वज्ञान, विचार कधी वाचले नाहीत असे ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्री-पुरुष आपल्या

हक्कासाठी प्रस्थापितांविरुद्ध किंवा शासनाविरुद्ध धरणे आंदोलन, उपोषण, सत्याग्रह करीत असल्याचे दिसून येते. कारण सत्याग्रह हे अन्याय निवारणाचे शस्त्र आहे. यावरून हे लक्षात येते की सत्याग्रह हे भ्याडाचे हत्यार नसून ते धैर्यवान आणि बलवान मानवाचे शस्त्र आहे आणि याच शस्त्राने आपल्याला मानवतेची नवी संस्कृती निर्माण करावयाची आहे. खऱ्या अर्थाने गांधीजींचा सत्याग्रह हा राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच धार्मिक समस्यांचा सार्वत्रिक निराकरण करण्याचा सर्वात प्रभावी सुक्ष्म व अनोखा मार्ग आहे. अहिंसक क्रांतीचे सार्वत्रिक परिणामकारक शस्त्र म्हणून सत्याग्रह त्याची उपयुक्तता कायमच राखेल. कारण सत्याग्रहात सत्याची व प्रेमाची मोठी ताकद असून तिच्यात अन्यायाचे न्यायात, गुलामाचे स्वातंत्र्यात व विषमतेचे समतेत रूपांतर करण्याची ताकद आहे.

## सत्याग्रहाचे आजचे स्वरूप

आजच्या काळात मोठ्या प्रमाणावर सत्याग्रहाच्या माध्यमातून स्वैराचार निर्माण होत आहे.काही लोक सत्याग्रहाचा मार्ग अवलंबून जनतेस वेठीस धरतात. सत्याग्रह करणे म्हणजे केवळ राजकारण झाले आहे स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधींनी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारून जगाला एक आदर्श मार्ग दाखवून दिला. मात्र काळाच्या ओघात सत्याग्रहाला राजकीय पक्षांनी आपल्या हातचे बाहुले बनवलेले दिसून येते. सत्याग्रह ही एक मोठी चळवळ असून ती सर्वसामान्य लोकांच्या लढण्याचा आधार आहे. सर्वसामान्य जनता आपल्या मार्गापर्यंत सत्याग्रहाच्या माध्यमातूनच पोहोचू शकते मात्र याचा गैरवापर करणारे लोकच सध्या जास्त आहेत. गांधीजींच्या विचारांचे अनुकरण करण्यासाठी आज आपल्याला टोपी किंवा धोतर घालण्याची गरज नाही किंवा त्यांचे ब्रह्मचर्य अंगीकारण्याची गरज नाही. मात्र आपण कोणाचाही द्वेष करता कामा नये आपल्यातील दोष नाहीसा करण्यासाठी फक्त गांधीजींच्या शिकवणुकीवर विश्वास ठेवावा लागेल. म्हणजे आपल्यातील दोष नाहीसा होऊन आपल्याला शांततेची अनुभूती येईल. मात्र आजचे राजकारण आणि समाजकारण पूर्णपणे वेगळे आहे. येथे द्वेष आणि असुरक्षिततेलाच प्रोत्साहन मिळते. आजचा नेता किंवा पुढारी अनेक सुरक्षारक्षकांच्या वेढ्यात असतो तो आपल्याला काय निर्भय बनवणार, असे नेते फक्त जनतेच्या मनात भीतीची भावना पसरवू शकतात. गांधीजींना ना कधी मृत्यूची भीती होती ना कधी सत्तेची भूक, केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी त्याने शांततेचा संदेश दिला आणि जगाचे शांतिदूत बनले.

## निष्कर्ष

गांधीजींच्या अहिंसेने आपल्याला कोणत्याही हिंसेशिवाय शौर्याने लढायला शिकवले. हे शक्य नाही झाले तर हात उचलण्याचा सल्लाही त्यांनी दिला मात्र याचा अर्थ असा नाही की गर्दी किंवा जमाव करून कोणावरही हल्ला करणे किंवा देशाच्या संपत्तीची तोडफोड करणे किंवा नासधूस करणे, जाळपोळ करणे. उपोषण आणि सत्याग्रह या सारख्या निषेधाच्या पद्धती वापरून अन्यायाविरुद्ध अहिंसक मार्गाने संघर्ष करण्याची शिकवण गांधीजी आपल्याला देतात. प्रेम, त्याग, इतरांवर विश्वास आणि सहजीवनाचा संदेश आजच्या असुरक्षित आणि विसंवादाने भरलेल्या जगात गरजेचा आहे. गांधीजींनी सत्याग्रहाच्या रूपाने संपूर्ण मानव जातीला दिलेला हा महत्त्वाचा अनमोल ठेवा आहे. त्यामुळे बदलत्या काळात, बदलत्या पिढीने गांधीजीच्या सत्याग्रहाचा आशय नीट समजून घेऊन त्याला नवीन आयाम देऊन त्याचा वापर केल्यास अन्याय निवारणाचे एक महत्त्वाचे शस्त्र म्हणून सत्याग्रह नक्कीच उपयुक्त ठरेल याची खात्री आहे.

एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना आधुनिकतेचा परमोच्च बिंदू गाठत असताना मानवाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते या काळात मानव हा आधुनिक शास्त्राच्या समोर पूर्णपणे बाजूला फेकला सारखा वाटत असला तरी त्याला मोठ्या धैर्याने विरोध करण्याचे धाडस जगाला महात्मा गांधींच्या सत्याग्रह चळवळीत निर्माण केले आहेत म्हणूनच आज मानवाला नैतिकतेचा धैर्याचा मानवतेचा संदेश देत असताना हा मार्ग योग्य आहे याची जाणीव होत आहे प्राचीन भारतीय संस्कृतीत ही आजही जगाला मार्गदर्शक तत्त्वे सांगणारी तत्त्वप्रणाली आहेत प्राचीन भारतात मानवाला निर्माण होणाऱ्या समस्येतून मुक्त करण्यासाठी प्रामुख्याने वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांनी मानवाला यातून मार्ग काढण्यासाठी सत्य अहिंसा ही तत्त्वे सांगितली होती त्याच तत्वाचा आधार घेत भारतातील स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींनी सत्याग्रह चळवळ वापरून स्वातंत्र प्राप्त करून दिले त्यामुळेच त्यामुळेच आजही जगाच्या कोणत्याही भूमीवर गेलो तर शत्रूला स्वैराचाराला विरोध करण्यासाठी मोठ्या धाडसाने शांततेच्या मार्गाने गांधीजींची सत्याग्रह चळवळ वापरली जाते मध्यंतरीच्या काळात अफगाणिस्तान सारख्या देशात तालिबान सरकारची स्थापना झाली या प्रतिगामी सरकारच्या विरोधात काही महिला निशब्द पणे विरोध करण्यासाठी फक्त हातामध्ये फलक घेऊन शांततेने विरोध केला होता म्हणूनच आज जगात मानवतेच्या दृष्टीने जीवन जगण्यासाठी शांततेचा मार्ग स्वीकारण्यासाठी शांततेने विरोध करून मानवाला मानवासारखे जगले पाहिजे अशी भूमिका विविध देशातून जोर धरत आहे कारण निसर्गाच्या सानिध्यात शांतपणे मानवाने मानवासारखे राहिले पाहिजे आधुनिक काळात यंत्राच्या साह्याने निर्माण होणारी अनेक प्रश्न नवीन नवीन शस्त्रे यापेक्षा मानवाला सत्याग्रहाच्या मार्गाने योग्य दिशा प्राप्त होऊ शकते हे सिद्ध होऊ लागले आहे यासाठी कदाचित वेळ जास्त जाईल मात्र ही तत्त्वप्रणाली आज ना उद्या सर्व जगाला तारक ठरेल असे मला वाटते.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. एम. के. गांधी, दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास, (अनु.) ब्रिजमोहन हेडा, लोकवत प्रकाशन पुणे, 1968.

२. आर. के. प्रभू, यु. आर. राव, (संपा.), (अनु.) ब्रिजमोहन हेडा, महात्मा गांधीजींचे विचार, नवजीवन मुद्रणालय अहमदाबाद, 1966.

३. सुजाता, बापू और स्त्री, सेवासंघ प्रकाशन, वाराणसी, जून 2012.

४. एम. के. गांधी, गांधीजी कि अपेक्षा, हरप्रसाद व्यास (संग्राहक), नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद, जानेवारी 1966.

५. एम. के. गांधी, बापू कि सिख, सस्ता साहित्य मंडल दिल्ली.

६. एम. के. गांधी, नैतिक धर्म, ब्रिजमोहन हेडा (अनु.) नवजीवन प्रकाशन अहमदाबाद, मार्च 2012.

७. बापट भा. रा., (अनु.), गांधी: कार्य आणि विचारप्रणाली, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृत मंडळ, मुंबई 1973.

८. रॉय मानवेंद्रनाथ, मानवतावाद, पारीख गोवर्धन, (अनु.), प्रज्ञा पाठशाळा मंडळ वाई, 1955.

९. तेंडुलकर डी. जी. महात्मा, (english), खंड 2.

१०. पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, ऑक्टोबर 1983.